RNI No. MAHENG /2009/35528
Reg. No. MH/MR/South-344/2011-13

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष ५, अंक ४९ (२)] मंगळवार, डिसेंबर २४, २०१३/पौष ३, शके १९३५ [पृष्ठे ६, किंमत : रुपये १८.००

असाधारण क्रमांक ९०

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Regulation of Sugarcane Price (Supplied to Factories) Act, 2013 (Mah. Act No. XXXIII of 2013), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Principal Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XXXIII OF 2013

(First published, after having received the assent of the Governor, in the *"Maharashtra Government Gazette"*, on the 24th December 2013.)

An Act to regulate the Price of Sugarcane supplied to sugar factories in the State of Maharashtra.

**WHEREAS** it is expedient to regulate the Price of Sugarcane supplied to sugar factories in the State of Maharashtra and to provide for matters connected therewith or incidental thereto; it is hereby enacted in the Sixty-fourth Year of the Republic of India, as follows :—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Act may be called the Maharashtra Regulation of Sugarcane Price (Supplied to Factories) Act, 2013.

(*2*) It shall come into force on such date as the State Government may, by notification in the *Official Gazette*, appoint.



PDF compression, OCR, web optimization using a watermarked evaluation copy of CVISION PDFCompressor

Definitions.

**2.** In this Act, unless the context otherwise requires,—

(*a*) " Board " means the Sugarcane Control Board constituted under section 3 ;

(*b*) " Chief Secretary " means the Chief Secretary to the Government of Maharashtra ;

(*c*) " Commissioner for Sugar " means the Commissioner for Sugar, Maharashtra State ;

(*d*) " factory " means a sugar factory where any manufacturing process connected with the production of sugar is being carried or is ordinarily carried on with the aid of electricity and wherein twenty or more workers are working or were working on any day of the preceding twelve months ;

(*e*) " Government " or " State Government " means the Government of Maharashtra ;

(*f*) " Occupier of factory " means the person who has control over the affairs of a factory and where the said affairs are entrusted to a director, partner or administrator, such director, partner or administrator, as the case may be ;

(*g*) " prescribed " means prescribed by rules made under this Act ;

(*h*) " Secretary " means the Secretary to the Government ;

(*i*) " State " means the State of Maharashtra ;

(*j*) " Sugarcane " means Sugarcane intended for use in a sugar factory or *khandsari* sugar manufacturing unit ;

(*k*) " Sugarcane grower " means a person including a tenant who cultivates sugarcane either by himself or through members of his family or through hired labourers ;

(*l*) " Sugar season " means the year commencing on the first day of October and ending by thirtieth day of September next year.

Sugarcane Control Board.

**3.** (*1*) The State Government shall, as soon as may be, after the commencement of this Act, constitute a Sugarcane Control Board (hereinafter referred to as " the Board "), to perform such duties and functions assigned to it under this Act.

(*2*) The Board shall exercise jurisdiction throughout the State of Maharashtra.

(*3*) The Board shall consist of the following members, namely :—

| | | |
|---|---|---|
| (a) | Chief Secretary | .. Chairman ; |
| (b) | Secretary, Finance | .. Member ; |
| (c) | Secretary, Co-operation | .. Member ; |
| (d) | Secretary, Agriculture | .. Member ; |
| (e) | Five representatives of the factories in the State to be nominated by the Government, out of which three shall be representatives of the Co-operative Sugar Factories and two from other Sugar Factories in the State | .. Members; |
| (f) | Five representatives of the farmers to be nominated by the Government | .. Members; |
| (g) | Commissioner for Sugar | .. *Ex--officio* Member-Secretary. |

PDF compression, OCR, web optimization using a watermarked evaluation copy of CVISION PDFCompressor

(4) The non-official members of the Board shall receive such allowances as may be prescribed.

(5) Subject to the pleasure of the State Government, a non-official member shall hold office for a period of three years from the date of nomination. A member nominated once to the Board is not eligible for re-nomination for a second time.

(6) A non-official member may resign his office at any time, by writing in his own hand, addressed to the Government but he shall continue in his office until his resignation is accepted.

(7) The Government may remove a non-official member from his office if he incurs any one of the disqualification specified below, namely :—

(a) becomes an un-discharged insolvent; or

(b) is convicted and sentenced to imprisonment for an offence which in the opinion of the Government involves moral turpitude; or

(c) becomes of unsound mind, and stands so declared by a competent court; or

(d) refuses to act or becomes incapable of acting as the member.

(8) Notice of the meeting of the board, quorum and procedure regarding transactions of the business of the Board shall be such as may be prescribed.

(9) The Board shall meet at least thrice in a year commencing before starting of the crushing season, after closure of the crushing season and at the end of the Sugar season. The Member-Secretary of the Board may, subject to the control of the Chairman, convene a meeting as often as may be necessary and shall also do so when required by one-third of the members.

(10) The Board shall while inquiring into the matters in discharge of its functions under this Act, have all the powers of a civil court while trying a civil suit under the Civil Procedure Code, 1908, and in particular, in respect of the following matters, namely :— 5 of 1908.

(a) summoning and enforcing the attendance of any person from the State and examining him on oath;

(b) requiring the discovery and production of any document;

(c) receiving evidence on affidavits;

(d) requisitioning any public record or copy thereof from any Court or office;

(e) issuing commissions for the examinations of documents and witnesses;

(f) any other matter which may be prescribed.

(11) No act or proceeding of the Board shall be rendered invalid for the mere fact that there was one or more unfilled vacancy in the Board at the time of such act or proceedings were made.

Functions of Board.

4. The Board shall discharge the following functions, namely :—

(a) to decide Sugarcane price payable to the farmers, which shall be in addition to the Fair and Remunerative Price (hereinafter referred to as "FRP") decided by the Central Government under the provisions of the Sugarcane (Control) Order, 1966, on revenue sharing basis :

Provided that, while fixing Sugarcane Price, if it is decided to fix the Sugarcane Price on the basis of the value of sugar including the value of the by-products such as bagasse, molasses and press mud, the Sugarcane Price shall be arrived at as a sum equal to seventy per cent. of the ex-mill value of sugar alongwith such by-products :



PDF compression, OCR, web optimization using a watermarked evaluation copy of CVISION PDFCompressor

Provided further that, if it is decided to fix the Sugarcane Price only on the basis of the value of sugar, ignoring the value of the aforesaid three by-products, the Sugarcane Price shall be arrived at as a sum equal to seventy-five per cent. of the ex-mill value of sugar ;

(*b*) to offer advice on any matter which may be referred to it by the Government, especially in respect of the regulation of the purchase and supply of Sugarcane ;

(*c*) to bring to the notice of the Commissioner for Sugar, cases of breach of any of the provisions of the Act, and of the rules made thereunder, and to make suggestions for the prevention of the same ;

(*d*) to recommend ways and means of maintaining healthy relations between occupier of the factory and Sugarcane growers.

Payment to Sugarcane growers.

**5.** (*1*) As soon as the Sugarcane is supplied to the occupier of a factory, the factory shall be liable to pay, within fourteen days of the receipt thereof, the minimum price as per FRP applicable at the relevant time.

(*2*) Payment shall be made on the basis of the recorded weight of the Sugarcane at the factory.

(*3*) The actual payment for Sugarcane fixed by the Board shall be paid in two steps. The first would be payment of FRP. Balance payment of Sugarcane dues will be paid subsequent to publication of half yearly ex-mill prices and values, determined by the Board in accordance with the provisions of clause (*a*) of section 4.

(*4*) Every payment made by the factory, under the provisions of this Act shall be paid to the farmer through his bank account only.

Offences and penalties.

**6.** (*1*) Contravention of the provisions of this Act and the rules made thereunder shall be an offence.

(*2*) Every such person shall on conviction be punished with fine which may extend to twenty-five thousand rupees.

Cognizance of offences.

**7.** No court shall take cognizance of any offence punishable under section 6, except on a complaint made by an officer authorized by the Commissioner for Sugar and no court inferior to that of a Judicial Magistrate of the First Class, shall try any such offence.

Compounding of offences.

**8.** (*1*) The Commissioner for Sugar may, either before or after the institution of proceedings, for any offence punishable under section 6, after affording the person concerned an opportunity of being heard, accept from such person by way of composition of an offence a sum of rupees fifty thousand or a sum double the amount of due and payable under the provisions of section 5, whichever is more.

(*2*) On payment of such sum as may be determined by the Commissioner for Sugar under sub-section (*1*), no further proceedings shall be taken against the accused person in respect of the same offence and any proceedings, if already taken, shall stand abated.

Offences by companies.

**9.** (*1*) Where an offence under this Act has been committed by a company, every person who, at the time the offence was committed, was in charge of, and was responsible to the company for the conduct of the business of the company, as well as the company shall be deemed to be guilty of the offence and shall be liable to be proceeded and punished accordingly :

PDF compression, OCR, web optimization using a watermarked evaluation copy of CVISION PDFCompressor

Provided that, nothing contained in this sub-section shall render any such person liable to any punishment provided in this Act, if he proves that the offence was committed without his knowledge or that he has exercised all due diligence to prevent the commission of such offence.

(*2*) Notwithstanding anything contained in sub-section (*1*), where an offence under this Act has been committed by a company and it is proved that the offence has been committed with the consent or connivance of, or is attributable to any neglect on the part of any director, manager, secretary or other officer of the company, such director, manager, secretary or other officer shall also be deemed to be guilty of that offence and shall be liable to be proceeded and punished accordingly.

*Explanation.*—For the purposes of this section,—

(*a*) " company " means a body corporate, and includes a firm, association of persons or body of individuals whether incorporated or not ;

and

(*b*) " Director " in relation to a firm, means a partner in the firm and in relation to any association of persons or body of individuals, means any member controlling the affairs thereof .

Commissioner for Sugar to be public servant.

**10.** The Commissioner for Sugar and every officer appointed under this Act shall be deemed to be public servant within the meaning of section 21 of the Indian Penal Code, 1860. 45 of 1860.

Protection of action taken in good faith.

**11.** No suit, prosecution or other legal proceedings shall lie against Government or any officer or official for anything which is done or purported to have been done in good faith in pursuance of any provisions of this Act or any rule or order made thereunder.

Power to make rules.

**12.** (*1*) The Government may, by notification in the *Official Gazette,* make rules for carrying into effect the provisions of this Act.

(*2*) In particular and without prejudice to the generality of the foregoing provisions, such rules may provide for ,—

(*a*) the allowances payable to the non-official members of the Board ;

(*b*) the procedure to be adopted by the Board in discharging its functions under this Act ;

(*c*) the form in which any notice required shall be given ;

(*d*) any other matter which is to be or may be prescribed under this Act.

(*3*) Except when the rules are made for the first time, all rules made under this Act shall be subject to the condition of previous publication.



PDF compression, OCR, web optimization using a watermarked evaluation copy of CVISION PDFCompressor

(*4*) Every rule made under this Act shall be laid, as soon as may be, after it is made, before each House of the State Legislature, while it is in session for a total period of thirty days which may be comprised in one session or in two or more successive sessions, and if, before the expiry of the session in which it is so laid or the session immediately following, both Houses agree in making any modification in the rule or both Houses agree that the rule should not be made, and notify such decision to that effect in the *Official Gazette,* the rule shall, from the date of publication of such decision in the *Official Gazette,* have effect only in such modified form or be of no effect, as the case may be, so, however, that any such modification or annulment shall be without prejudice to the validity of anything previously done or omitted to be done under that rule.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

PDF compression, OCR, web optimization using a watermarked evaluation copy of CVISION PDFCompressor

RNI No. MAHBIL /2009/35530
Reg. No. MH/MR/South-341/2011-13

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ५, अंक २७ (२)] मंगळवार, डिसेंबर २४, २०१३/पौष ३, शके १९३५ [पृष्ठे ५, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ५३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३.**—महाराष्ट्र राज्यातील साखर कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या उसाच्या दराचे विनियमन करण्याकरिता अधिनियम. . . . . . . | पृष्ठे १-५ |

दिनांक २४ डिसेंबर २०१३ रोजी माननीय राज्यपाल यांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

**सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३.**

(माननीय राज्यपाल यांची संमती मिळाल्यांनतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक २४ डिसेंबर २०१३ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र राज्यातील साखर कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या उसाच्या दराचे विनियमन करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील साखर कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या उसाच्या दराचे विनियमन करणे आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र (कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या) ऊस दराचे विनियमन अधिनियम, २०१३ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.



PDF compression, OCR, web optimization using a watermarked evaluation copy of CVISION PDFCompressor

व्याख्या. २. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " मंडळ " याचा अर्थ, कलम ३ अन्वये घटित केलेले ऊस नियंत्रण मंडळ, असा आहे ;

(ख) " मुख्य सचिव " याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा मुख्य सचिव, असा आहे ;

(ग) " साखर आयुक्त " याचा अर्थ, साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, असा आहे ;

(घ) " कारखाना " याचा अर्थ, जेथे साखर उत्पादनाशी संबंधित असलेली कोणतीही निर्मिती प्रक्रिया विद्युतशक्तीच्या साहाय्याने चालविली जात असेल किंवा सामान्यतः चालविली जाते आणि ज्यात मागील बारा महिन्यांमध्ये कोणत्याही दिवशी वीस किंवा त्यापेक्षा अधिक कामगार काम करीत असतील किंवा काम करीत होते असा साखर कारखाना, असा आहे ;

(ङ) " शासन " किंवा "राज्य शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(च) " कारखान्याचा भोगवटदार " याचा अर्थ, कारखान्याच्या कारभारावर नियंत्रण असलेली व्यक्ती असा आहे आणि उक्त कारभार हा, संचालक, भागीदार, किंवा यथास्थिति, प्रशासक यांच्याकडे सोपविलेला असेल त्याबाबतीत असा संचालक, भागीदार किंवा प्रशासक असा आहे ;

(छ) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे ;

(ज) " सचिव " याचा अर्थ, शासनाचा सचिव, असा आहे ;

(झ) " राज्य " याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य, असा आहे ;

(ञ) " ऊस " याचा अर्थ, साखर कारखान्यामध्ये किंवा खांडसरी साखर निर्मिती युनिटामध्ये वापरण्याचे उद्देशित असलेला ऊस, असा आहे ;

(ट) " ऊस उत्पादक " याचा अर्थ, एखाद्या कुळासह, जी व्यक्ती, एकतर स्वतः किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्यांमार्फत किंवा मजुरी दिलेल्या मजुरांमार्फत, उसाची शेती करते अशी व्यक्ती, असा आहे ;

(ठ) " साखर हंगाम " याचा अर्थ, १ ऑक्टोबर रोजी सुरू होणारे व पुढील वर्षी ३० सप्टेंबर रोजी संपणारे वर्ष, असा आहे.

ऊस नियंत्रण मंडळ. ३. (१) राज्य शासन, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, शक्य तितक्या लवकर, या अधिनियमात नेमून दिलेली अशी कर्तव्ये व कार्ये पार पाडण्याकरिता ऊस नियंत्रण मंडळ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मंडळ" असा करण्यात आलेला आहे), घटित करील.

(२) मंडळाची अधिकारिता संपूर्ण महाराष्ट्र राज्यात असेल.

(३) मंडळ, पुढील सदस्यांनी मिळून बनलेले असेल :—

| | | | |
|---|---|---|---|
| (क) | मुख्य सचिव | — | अध्यक्ष ; |
| (ख) | सचिव, वित्त | — | सदस्य ; |
| (ग) | सचिव, सहकार | — | सदस्य ; |
| (घ) | सचिव, कृषी | — | सदस्य ; |
| (ङ) | शासनाने नामनिर्देशित करावयाचे राज्यातील कारखान्यांचे पाच प्रतिनिधी, यापैकी तीन प्रतिनिधी हे, सहकारी साखर कारखान्यांचे असतील अणि दोन प्रतिनिधी हे, राज्यातील इतर साखर कारखान्यांचे असतील. | — | सदस्य ; |
| (च) | शासनाने नामनिर्देशित करावयाचे शेतकऱ्यांचे पाच प्रतिनिधी | — | सदस्य ; |
| (छ) | साखर आयुक्त | — | पदसिद्ध सदस्य-सचिव. |

(४) मंडळाच्या अशासकीय सदस्यांना, विहित करण्यात येतील असे भत्ते मिळतील.

(५) राज्य शासनाच्या मर्जीस अधीन राहून, अशासकीय सदस्य, त्याच्या नामनिर्देशनाच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीसाठी पद धारण करील. मंडळावर एकदा नामनिर्देशित झालेला सदस्य हा दुसऱ्यांदा पुर्ननामनिर्देशन केले जाण्यासाठी पात्र असणार नाही.

PDF compression, OCR, web optimization using a watermarked evaluation copy of CVISION PDFCompressor

(६) अशासकीय सदस्यास कोणत्याही वेळी, शासनाला उद्देशून, आपल्या स्वाक्षरीनिशी लिहिलेल्या अर्जाद्वारे आपल्या पदाचा राजीनामा देता येईल परंतु, त्याचा राजीनामा स्वीकारला जाईपर्यंत तो आपल्या पदावर राहील.

(७) नामनिर्देशित केलेल्या अशासकीय सदस्यास, खाली विनिर्दिष्ट केलेल्या अनर्हतांपैकी कोणतीही अनर्हता असल्यास, शासनास त्याला, त्याच्या पदावरून काढून टाकता येईल :—

(क) असा सदस्य अमुक्त नादार असेल ; किंवा

(ख) शासनाच्या मते, ज्यात नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असेल अशा कोणत्याही अपराधाबद्दल त्याला सिध्दापराधी ठरविले असेल व कारावासाची शिक्षा दिली असेल ; किंवा

(ग) तो विकल मनाचा असेल आणि सक्षम न्यायालयाने त्याला तसे घोषित केले असेल ; किंवा

(घ) सदस्य म्हणून कार्य करण्यास नकार दिला असेल किंवा तो कार्य करण्यास असमर्थ झाला असेल.

(८) मंडळाच्या बैठकीची सूचना, गणपूर्ती व मंडळाचे कामकाज चालविण्यासंबंधीची कार्यपद्धती विहित करण्यात येईल, त्याप्रमाणे असेल.

(९) मंडळ, प्रत्येक वर्षी, गाळप हंगामास सुरुवात होण्यापूर्वी, गाळप हंगाम संपल्यानंतर आणि ऊस हंगामाच्या शेवटी अशा कमीतकमी तीन वेळा बैठकी घेईल. मंडळाच्या सदस्य-सचिवास, अध्यक्षाच्या नियंत्रणाच्या अधीन राहून, आवश्यक वाटेल तितक्या वेळा बैठकी बोलविता येतील आणि एक-तृतीयांश सदस्यांनी मागणी केली असेल तेव्हा तो असे करील.

(१०) मंडळास, या अधिनियमाखालील आपली कार्ये पार पाडताना, एखाद्या दिवाणी न्यायालयास एखाद्या दाव्याची न्यायचौकशी करताना, आणि विशेषकरून, पुढील बाबींसंबंधात दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये असलेले सर्व अधिकार असतील :—

१९०८ चा ५.

(क) राज्यातील कोणत्याही व्यक्तीस समन्स पाठविणे व तिला हजर राहण्यास भाग पाडणे आणि तिची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) कोणत्याही दस्तऐवजाचा शोध घेण्यास व तो सादर करण्यास फर्माविणे ;

(ग) शपथपत्रावर पुरावा स्वीकारणे ;

(घ) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणताही सार्वजनिक अभिलेख किंवा त्याची प्रत मागविणे ;

(ङ) दस्तऐवज व साक्षीदार यांच्या तपासणीसाठी आयोगपत्रे काढणे ;

(च) विहित करण्यात येईल अशी कोणतीही बाब.

(११) मंडळाची कोणतीही कार्यवाही, अशी कार्यवाही करण्यात आली त्यावेळी, मंडळात कोणतेही रिक्त पद भरलेले नव्हते याच केवळ कारणावरून विधिअग्राह्य ठरणार नाही.

४. मंडळ पुढील कार्ये पार पाडील :— मंडळाची कार्ये.

(क) ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ च्या तरतुदीन्वये, उत्पन्न विभागणीच्या आधारे, केंद्र सरकारने ठरविलेल्या रास्त व किफायतशीर दराव्यतिरिक्त (यात यापुढे ज्याचा निर्देश, "रास्त व किफायतशीर दर (एफआरपी)" असा करण्यात आला आहे) असेल असा शेतकऱ्यांना द्यावयाचा उसाचा दर ठरविणे :

परंतु, उसाचा दर निश्चित करताना, भुसा (बगॅस), मळी (मोलैसिस) व प्रेसमड यांसारख्या उप-उत्पादनांच्या मूल्यांसह साखरेच्या मूल्याच्या आधारे उसाचा दर निश्चित करण्याचे ठरविण्यात आले असेल तर, उसाचा दर हा, अशा उप-उत्पादनांसह, साखरेच्या कारखाना मूल्याच्या (एक्स-मिल व्हॅल्यूच्या) सत्तर टक्के इतका असेल :

परंतु आणखी असे की, उपरोक्त तीन उप-उत्पादनांचे मूल्य लक्षात न घेता केवळ साखरेच्या मूल्याच्या आधारे उसाचा दर निश्चित करण्याचे ठरविण्यात आले असेल तर, उसाचा दर हा, साखरेच्या कारखाना मूल्याच्या (एक्स-मिल व्हॅल्यूच्या) पंचाहत्तर टक्के इतका असेल.



PDF compression, OCR, web optimization using a watermarked evaluation copy of CVISION PDFCompressor

(ख) उसाचा दर व पुरवठा यांच्या विनियमनाबाबत विशेषकरून, शासनाने, त्याच्याकडे निर्देशित केला असेल अशा कोणत्याही प्रकरणावर सल्ला देणे ;

(ग) अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचा व त्याखाली केलेल्या नियमांचा भंग केल्याची प्रकरणे साखर आयुक्तांच्या निदर्शनास आणून देणे आणि त्यास प्रतिबंध करण्याबाबत सूचना करणे ;

(घ) कारखान्याचा भोगवटादार व ऊस उत्पादक यांच्यामध्ये सलोख्याचे संबंध प्रस्थापित होण्याकरिता मार्ग व उपाय सुचवणे.

ऊस उत्पादकांना प्रदाने.

५. (१) कारखान्याच्या भोगवटादाराला उसाचा पुरवठा केल्यानंतर लगेच तो मिळाल्यापासून चौदा दिवसांच्या आत, रास्त व किफायतशीर दर (एफआरपी) प्रमाणे, किमान दर देण्यास कारखाना जबाबदार असेल.

(२) कारखान्यात उसाच्या वजनाच्या केलेल्या नोंदीच्या आधारे रक्कम प्रदान करण्यात येईल.

(३) मंडळाने उसासाठी निश्चित केलेले प्रत्यक्ष प्रदान हे दोन टप्प्यांमध्ये करण्यात येईल. प्रथम प्रदान हे, रास्त व किफायतशीर दर (एफआरपी) च्या प्रदानाप्रमाणे असेल. उसाचे देय असलेले शेषप्रदान हे, कलम ४ च्या खंड (क) च्या तरतुदींनुसार, मंडळाकडून निर्धारित केलेला, अर्धवार्षिक कारखाना (एक्स-मिल) दर व मूल्य प्रसिद्ध झाल्यानंतर करण्यात येईल.

(४) या अधिनियमाच्या तरतुदीन्वये, कारखान्याकडून केलेले प्रत्येक प्रदान हे, शेतकऱ्याला, फक्त त्याच्या बँक खात्यामार्फत देण्यात येईल.

अपराध व शास्ती.

६. (१) या अधिनियमाच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन करणे हा अपराध असेल.

(२) अशा प्रत्येक व्यक्तीस, दोषसिद्धीनंतर, पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची शिक्षा करण्यात येईल.

अपराधाची दखल.

७. कोणतेही न्यायालय, साखर आयुक्ताने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या तक्रारीखेरीज, कलम ६ खाली शिक्षापात्र असणाऱ्या कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही आणि प्रथम वर्ग न्याय दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयापेक्षा कनिष्ठ असणारे कोणतेही न्यायालय, अशा कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी करणार नाही.

अपराध आपसात मिटविणे.

८. (१) साखर आयुक्तास, कलम ६ अन्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल एकतर कार्यवाही सुरू करण्यापूर्वी किंवा सुरू केल्यानंतर, संबंधित व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यावर, अशा व्यक्तीकडून अपराधाबाबत आपसमेळ म्हणून पन्नास हजार इतकी रक्कम किंवा कलम ५ च्या तरतुदीन्वये देय आणि प्रदेय असलेल्या रकमेच्या दुपटीइतकी रक्कम, यांपैकी जी अधिक असेल ती रक्कम स्वीकारता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये, साखर आयुक्ताकडून निर्धारित करण्यात येईल अशी रक्कम प्रदान केल्यावर, त्याच अपराधाच्या संबंधात त्या आरोपी व्यक्तीविरुद्ध आणखी कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही आणि जर त्यापूर्वी कोणतीही कार्यवाही केलेली असेल तर, ती समाप्त होईल.

कंपन्यांनी केलेले अपराध.

९. (१) या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल त्या बाबतीत, असा अपराध घडला त्यावेळी कंपनीचे कामकाज चालविण्यासाठी कंपनीचा प्रभार ज्या व्यक्तीकडे होता आणि कंपनीचे कामकाज चालविण्यासाठी जी व्यक्ती जबाबदार होती, अशी प्रत्येक व्यक्ती, त्याचप्रमाणे कंपनी, त्या अपराधाबद्दल दोषी आहे असे मानले जाईल आणि तद्नुसार अशी व्यक्ती व कंपनी, कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा दिली जाण्यास पात्र असेल :

परंतु, अशा कोणत्याही व्यक्तीने असा अपराध आपल्या नकळत घडला होता किंवा असा अपराध घडू नये म्हणून तिने योग्य ती सर्व दक्षता घेतली होती असे सिद्ध केले तर, या पोट-कलमातील कोणत्याही बाबींमुळे ती व्यक्ती या अधिनियमात तरतूद केलेल्या कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

PDF compression, OCR, web optimization using a watermarked evaluation copy of CVISION PDFCompressor

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल आणि त्या कंपनीच्या कोणत्याही संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा अन्य अधिकाऱ्याच्या संमतीने किंवा मूकसंमतीने किंवा त्याने दुर्लक्ष केल्यामुळे असा अपराध घडल्याचे सिद्ध करण्यात आले असेल तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी देखील त्या अपराधाबद्दल दोषी आहे असे मानले जाईल आणि त्यांच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा दिली जाण्यास ते पात्र असतील.

**स्पष्टीकरण.**– या कलमाच्या प्रयोजनार्थ,–

(क) "कंपनी" याचा अर्थ, निगम-निकाय असा आहे आणि त्यात भागीदारी संस्थेचा किंवा व्यक्तींच्या संघाचा अथवा व्यक्तींच्या संस्थेचा मग ती विधी संस्थापित असो वा नसो समावेश होतो ; आणि

(ख) भागीदारी संस्थेच्या संबंधात "संचालक" याचा अर्थ, त्या भागीदारी संस्थेतील भागीदार, असा आहे आणि व्यक्तींचा संघ किंवा व्यक्तींची संस्था यांच्या संदर्भात 'संचालक' याचा अर्थ, तिच्या कामकाजाचे नियंत्रण करणारा कोणताही सदस्य, असा आहे.

**१०.** साखर आयुक्त आणि या अधिनियमाखाली नियुक्त केलेला प्रत्येक अधिकारी हा, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. साखर आयुक्त लोकसेवक असणे.

१८६० चा ४५.

**११.** हा अधिनियम किंवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा आदेश याच्या कोणत्याही तरतुदींना अनुसरून, सद्‌भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजिलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल, शासनाविरुद्ध किंवा कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध किंवा कर्मचाऱ्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार नाही. सद्‌भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण.

**१२.** (१) शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी नियम करता येतील. नियम करण्याचा अधिकार.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा नियमात पुढील बाबींची तरतूद करता येईल :—

(क) मंडळाच्या अशासकीय सदस्यांना द्यावयाचे भत्ते ;

(ख) मंडळाचे कामकाज चालविण्याबाबतची कार्यपद्धती ;

(ग) कोणतीही आवश्यक असलेली नोटीस ज्या नमुन्यात देण्यात येईल, तो नमुना ;

(घ) या अधिनियमान्वये विहित करण्यात येईल किंवा विहित करता येईल, अशी कोणतीही इतर बाब.

(३) पहिल्यांदाच तयार करण्यात आलेल्या नियमांखेरीज, या अधिनियमान्वये केलेले सर्व नियम हे पूर्वप्रसिद्धीच्या अटींच्या अधीन असतील.

(४) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनांत एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनामध्ये तो अशा प्रकारे मांडण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्या अधिवेशनाच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे सहमत झाली किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहे सहमत झाली आणि तशा अर्थाचा त्यांचा निर्णय, **राजपत्रात** अधिसूचित करण्यात आला तर, असा निर्णय **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून असा नियम केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरुपात अंमलात येईल किंवा, यथास्थिति, अंमलात येणार नाही. तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

PDF compression, OCR, web optimization using a watermarked evaluation copy of CVISION PDFCompressor

PDF compression, OCR, web optimization using a watermarked evaluation copy of CVISION PDFCompressor